## जनसंपर्क विभाग

जळगाव, (प्रतिनीधी) दि. २६ सप्टेंबर : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या अधिसभेची सभा शनिवार, दि. २६ सप्टेंबर रोजी कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे व कुलसचिव डॉ. विनोद पाटील मंचावर उपस्थित होते.

आजच्या सभेत विद्यापीठाच्या सन २०२५-२०२६ वर्षाच्या लेखापरीक्षण अहवालास चर्चेअंती मंजूरी देण्यात आली. हा अहवाल व्यवस्थापन परिषदेने शिफारस केला होता. आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सव 'युवा रंग २०२५'च्या खर्चासही सभेत मान्यता देण्यात आली. तसेच विद्यार्थी विकास विभागाचा अहवाल, विद्यार्थी तक्रार निवारण समितीचा अहवाल तसेच क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचा वार्षिक अहवाल व आश्वासन पुर्तता समितीचा अहवाल मान्यतेसाठी अधिसभेसमोर ठेवण्यात आला होता. या सर्व अहवालांना अधिसभेने मान्यता दिली.

सभेच्या पुढील सत्रात विद्यापीठाची गुणवत्ता वाढ, शैक्षणिक व प्रशासकीय बाबी तसेच विविध सामाजिक विषयांवर सदस्यांनी चर्चा केली. विद्यापीठाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेल्या विविध बाबींवर यावेळी विचारविनिमय करण्यात आला.

सभेच्या प्रारंभी नुतन सदस्य प्राचार्य डॉ. मिलींद बिल्दीकर व प्राचार्य एस.पी. पवार यांचा विशेष कामगिरीबद्दल सत्कार करण्यात आला. प्रश्नोत्तराच्या तासात अधिसभा सदस्य प्रा. धिरज वैष्णव व नितीन ठाकूर यांनी उपस्थित केलेल्या विविध प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. इतर सदस्यांना प्रश्नांची उत्तरे पाठविण्यात आली आहेत.

कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांनी बैठकीचे सुत्रसंचालन केले. या बैठकीला राजेंद्र नन्नवरे, आ. डॉ. मनिषा कायंदे, प्राचार्य एस.एस. राजपूत, प्रा. जगदीश पाटील, डॉ. राजेश जवळेकर, डॉ. दिनेश पाटील, प्राचार्य संजय सुराणा, ॲड अमोल पाटील, नितीन झाल्टे प्राचार्य सखाराम पाटील, प्राचार्य आय.डी. पाटील, प्राचार्य महेंद्र रघुवंशी, प्राचार्य वैशाली पाटील, विलास जोशी, प्रा.शिवाजी पाटील, प्रा. संदीप नेरकर, प्रा.एस.टी. भुकन, केदारनाथ कवडीवाले, प्रा. गजानन पाटील, डॉ. मंदा गावीत, प्रा.सुरेखा पालवे, प्रा. वर्षा पाटील, डॉ. पद्माकर पाटील, प्रा. विशाल पराते, प्रा. किर्ती कमळजा, विष्णू भंगाळे, अमोल मराठे, ऋषीकेश चित्तम, अमोल सोनवणे, दिनेश खरात, स्वप्नाली महाजन, डॉ. कांचन महाजन, प्रा. जयवंत मगर, जयंत उत्तरवार, नरेंद्र नारखेडे, ॲड. केतन डाके, नेहा जोशी, मिनाक्षी निकम, दिपक पाटील, वैशाली वराडे उपस्थित होते. सर्व सदस्यांनी विविध विषयांवर चर्चा केली व त्यावर काही उपयुक्त सूचना केल्या. सभा सायंकाळी उशिरा पर्यंत सुरु होती.

**बातमी क्र. २**

जळगाव, (प्रतिनीधी) दि. २६ सप्टेंबर : राज्यभर राबविण्यात येत असलेल्या 'रोजगार महाकुंभ-महाराष्ट्र' या उपक्रमांतर्गत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथे मंगळवार, दि. २९ सप्टेंबर २०२६ रोजी 'महाकुंभ रोजगार मेळावा' आयोजित करण्यात आला आहे. विद्यापीठाच्या युनिव्हर्सिटी इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी येथे हा रोजगार मेळावा होणार आहे.

या रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून जळगाव जिल्ह्यासह परिसरातील युवक-युवती तसेच पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांना विविध कंपन्या, उद्योग व आस्थापनांमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. विविध उद्योग व आस्थापनांचा या मेळाव्यात सहभाग राहणार असून उमेदवारांना सहभागी कंपन्यांच्या प्रतिनिधींशी थेट संवाद साधण्याची तसेच उपलब्ध रोजगाराच्या संधींबाबत माहिती घेण्याची संधी मिळणार आहे.

रोजगाराच्या शोधात असलेल्या युवक-युवती आणि विद्यार्थ्यांसाठी हा मेळावा महत्त्वपूर्ण ठरणार असून, विविध क्षेत्रांतील रोजगाराच्या संधी एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहेत. उमेदवारांनी आवश्यक शैक्षणिक कागदपत्रे व अद्ययावत बायोडाटा घेऊन मेळाव्यास उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

..........................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ दिनांक: २६ सप्टेंबर, २०२३

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

**जनसंपर्क अधिकारी करीता**